# डॉ. सुरेश सावंत यांच्या निवडक मराठी बालकविता : एक अभ्यास

संशोधक विद्यार्थी

**समाधान शिकेतोड**

संशोधन केंद्र,मराठी भाषा विभाग,बलभीम महाविद्यालय बीड.

samadhanvs@gmail.com

## १.१ प्रस्तावना :

मराठी बालसाहित्याच्या समृद्ध परंपरेत डॉ. सुरेश सावंत यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी मुलांसाठी सातत्याने बालकविता लेखन केलेले आहे. त्यांच्या बालकविता शालेय पाठ्यपुस्तकात आहेत. त्यांच्या बालकविता केवळ मनोरंजन करत नाहीत, तर बालमनावर उत्तम संस्कार करत त्यांचे भावविश्व समृद्ध करतात. प्रस्तुत संशोधन निबंधात डॉ. सुरेश सावंत यांच्या 'निवडक बालकवितांचा अभ्यास' करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यांच्या कवितांमधील नादमधुरता, कल्पकता, सोपी भाषा आणि निसर्गप्रेम या वैशिष्ट्यांचा वेध यात घेण्यात आला आहे. आधुनिक काळातील संगणक आणि मोबाईल संस्कृतीत हरवत चाललेल्या बालपणाला त्यांच्या कविता पुन्हा निसर्गाच्या कुशीत आणतात.

त्यांच्या 'आभाळमाया' सारख्या पुरस्कारप्राप्त कलाकृतींमधून आधुनिक बालमानसशास्त्राचे अचूक प्रतिबिंब कसे उमटते, याचे विश्लेषण या शोधनिबंधात आहे. बालकांचे भावविश्व, सामाजिक जाणिवा आणि मूल्यांची रुजवणूक या निकषांवर त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन करणे हा या अभ्यासाचा मुख्य हेतू आहे. हा संशोधन निबंध डॉ. सुरेश सावंत यांच्या काव्यात्मक कौशल्यांवर प्रकाश टाकून मराठी बालसाहित्याच्या अभ्यासकांना नवी दृष्टी देणारा ठरेल. बदलत्या काळाच्या पार्श्वभूमीवर डॉ. सुरेश सावंत यांच्या बालकवितांचे समकालीन महत्त्व अधोरेखित करणे हेच या संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. थोडक्यात, हा अभ्यास त्यांच्या बालकवितांच्या अंतरंगाचा आणि बहिरंगाचा वेध घेणारा दस्तऐवज आहे.

## १.२ संशोधनाची उद्दिष्टे :

१) डॉ. सुरेश सावंत यांच्या कवितांमधील मुलांच्या भावविश्वाचा अभ्यास करणे.

२) डॉ. सुरेश सावंत यांच्या त्यांच्या बालकवितांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

३) डॉ. सुरेश सावंत यांच्या निवडक बालकवितांचा वाङ्मयीन मूल्यमापन करणे.

## १.२ डॉ. सुरेश सावंत यांची बडबडगीते,बालगीते:

डॉ. सुरेश सावंत हे बालसाहित्यातील एक ख्यातनाम नाव असून त्यांनी बालकांचे भावविश्व टिपणारी अनेक सुंदर, लयबद्ध आणि नादमधुर बालगीते व बडबडगीते लिहिली आहेत. १) हिरवे हिरवे झाड, (१९९५) २) जांभुळबेट, (१९९८) (राज्यपुरस्कार), ३) भुताचा भाऊ, (१९९९) ४) बालकनीती, (२०००) (राज्यपुरस्कार), ५) काठीचा घोडा, (२००१) ६)पळसपापडी, (२००२) (राज्यपुरस्कार), ७) कॉमिक्सच्या जगात,(२००३)८) रानफुले,(२००४ ) ९) युद्ध नको, बुद्ध हवा, (२०१९) १०) नदी रुसली, नदी हसली, (२०२०) ११) गूगलबाबा, (२०२१), १२) एलियन आला स्वप्नात (२०२३) १३) आभाळमाया (२०२३) १४) रंग लागले नाचायला (२०२४) हे सर्व बालकवितासंग्रह मुलांच्या पसंतीला उतरलेले आहेत.

प्राथमिक वर्गातील लहान मुलांना सहज गुणगुणता येतील अशी सोपी आणि यमक जुळणारी शब्दरचना त्यांच्या बडबडगीतांमध्ये आढळते.डॉ. सुरेश सावंत यांची बडबडगीते आणि बालगीते आजच्या डिजिटल युगात मोबाईलमध्ये हरवलेल्या बालपणाला पुन्हा एकदा आनंदाच्या कुशीत आणण्याचे काम करत आहेत. बालसाहित्याचे समीक्षक ल.म.कडू डॉ सुरेश सावंत यांच्या बालकवितेबद्दल म्हणतात, " डॉ. सावंत मुलांना शब्दांबरोबर गुंतवत नेत कवितेच्या शेवटी एक विचार बीज बालमनात पेरून जातात. ते कधीतरी

नक्की रुजेल, असा आशावाद धरून पुढे चालतात. हेच त्यांच्या साहित्याचे गमक आहे.” बालसाहित्याचे समीक्षक ल.म.कडू डॉ सुरेश सावंत यांच्या बालकवितेबद्दल मांडलेले मत अगदी समर्पक असून त्यांच्या बालकवितासंग्रहातील कविता मुलांच्या मनात विचार बीज पेरतात,मुल्यांची पेरणी करतात.

**१.३ डॉ. सुरेश सावंत यांच्या बालकवितेची वैशिष्टे :**

डॉ. सुरेश सावंत यांनी रवींद्रनाथ टागोर आणि सानेगुरुजी यांच्या कार्याचा आदर्श नजरेसमोर ठेवलेला आहे. त्या आदर्शला स्मरून त्यांनी बालसाहित्य आणि बालशिक्षणाच्या क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य केले आहे. डॉ. सुरेश सावंत यांची बालकविता लयबद्धता, तालबद्धता, नादमयता, गेयता,कल्पनाशिलता आणि अद्भूतरम्यता ह्या गुणांनी समृद्ध आहे. त्यांच्या प्रत्येक कवितेत अनुप्रास आणि यमक येत असल्यामुळे ओळीओळींतून नादमयता दिसून येते. डॉ. सुरेश सावंत यांनी हाताळलेले कवितांचे वेगवेगळे विषय हाताळलेले आहेत. त्यांच्या कवितांचे रसग्रहण केले असता त्यांना बालमानसाची चांगली जाण असल्याचे दिसते. मुलांच्या मनाला भावतील, त्यांना आनंद देतील,त्यांना कल्पनेच्या विश्वात घेऊन जातील अशाच कविता त्यांनी केलेल्या आहेत.

डॉ. सावंत यांची बालकविता बालवाचकांना स्पर्श, रूप, रस, गंध आणि नाद ह्या संवेदनांचा प्रत्यय देते. त्यांच्याकवितेत कल्पनांची सहल, मजेदारपणा, विनोद असल्यामुळे ही कविता बालकुमारांच्या पसंतीला उतरली आहे. त्यांच्या एकापेक्षा एक सरस अशा चौदा बालकवितासंग्रहांचे मर्म हेच आहे. ‘मुलांच्या भावनांशी आणि कल्पनाविश्वाशी एकरूप होणाऱ्या आणि मुलांना आनंद देणा-या कविता’ असे उद्गार डॉ. सुरेश सावंत यांच्या बालकवितांविषयी मंगेश पाडगावकर यांनी काढले आहेत.

**१.३ डॉ. सुरेश सावंत यांच्या बालकवितेचे वाङ्मयीन मूल्यमापन :**

१) डॉ.सुरेश सावंत यांची बालकविता मराठी बालसाहित्यात उच्च दर्जाची, संस्कारक्षम आणि प्रयोगशील मानली जाते.

२) त्यांच्या कवितांवर त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक कारकीर्दीचा आणि बालमानसशास्त्राचा प्रगल्भ प्रभाव जाणवतो.

३) ते मुलांवर कोणताही उपदेश न लादता, थेट बालकांच्या भावविश्वाशी समरस होऊन संवाद साधतात. त्यांच्या रचनांमध्ये सोपे शब्द, यमक आणि अनुप्रास अलंकाराचा सुरेख वापर केल्यामुळे कमालीची गेयता आहे.

४) निसर्गातील घटकांचे मानवीकरण करून त्यांनी बालकांची कल्पनाशक्ती समृद्ध केली आहे.

५) डॉ. सुरेश सावंत यांच्या बालकवितेची शब्दयोजना आकलनसुलभ, सोपी आणि चपखल अशी असते. डॉ. सावंत यांची बालकविता बालकांचे भावविश्व आणि विचारविश्व समृद्ध करायला मदत करते.

६) त्यांनी त्यांच्या बालकावितेत अनेक रुपबंधाचा वापर केलेला आहे. अल्पाक्षरी कविता, दीर्घ कविता, अद्भुतरम्य कविता, मुक्तछंदातील कविता, अशा वेगवेगळ्या प्रकारच्या कविता त्यांनी लिहिलेल्या आहेत.

**१.३ सारांश :**

प्रस्तुत प्रकरणात डॉ. सुरेश सावंत यांच्या निवडक बालकवितांचा सखोल अभ्यास करण्यात आला असून, मराठी बालसाहित्यातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानावर प्रकाश टाकला आहे. कवीने आपल्या कवितांमधून निसर्ग, प्राणी-पक्षी, कुटुंब आणि एकूणच बालविश्वाचे अत्यंत जिवंत व नितांत सुंदर चित्रण रेखाटले आहे. बालकांच्या मानसिकतेचा अचूक वेध घेत त्यांच्याच नजरेतून हे जग मांडण्याचा यशस्वी प्रयत्न यात दिसून येतो. लहान मुलांना सहज आकर्षित करेल अशी साधी, सोपी, रसाळ आणि यमकप्रधान भाषाशैली हे या कवितांचे मुख्य वैशिष्ट्य आहे. केवळ रंजन न करता, मुलांमध्ये नैतिक मूल्ये, चांगल्या सवयी आणि सामाजिक जाणीव रुजवून त्यांचे भावविश्व समृद्ध करणे हा या कवितांचा मुख्य हेतू आहे. कवितांमधील उपजत नादमयता आणि गेयता यांमुळे त्या बालकांमध्ये विशेष लोकप्रिय ठरल्या आहेत.

**संदर्भ :**

१) डॉ.सुरेश सावंत,आभाळमाया,चेतक बुक्स,पुणे, २०२३, दुसरी आवृत्ती,मलपृष्ठ

२) डॉ.सुरेश सावंत,वाचन संस्कृती लेखन संस्कृती,साकेत प्रकाशन,छ.संभाजीनगर,२०२१

३) डॉ.सुरेश सावंत,बालसाहित्य आणि बालशिक्षणाचा अनुबंध,संगत प्रकाशन नांदेड, २०२२

४) डॉ.सुरेश सावंत, रानफुले, संगत प्रकाशन, नांदेड, २०१९,दुसरी आवृत्ती